VOL- VII ISSUE- VII JULY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# महात्मा गांधी यांचे अस्पृश्यते संबधी विचार

**डॉ. सरिता नागोराव गाडेगावकर**
श्रीमती इंदिरा गांधी अध्यापक महाविद्यालय वसरणी नांदेड.

महात्मा गांधी यांचे व्यक्तिमत्व संपूर्ण जगात अद्वितीय असे आहे. भारताच्या स्वातंत्र्याचे खरे शिल्पकार, भारताचे पितामह महात्मा गांधी यांनी संपूर्ण जगाला अहिंसा व सत्याग्रह अशा अमूल्य देणगी दिलेल्या आहेत. महात्मा गांधी यांच्या अहिंसा व सत्याग्रह यांच्यामुळे भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले. महात्मा गांधी हे फक्त राजकीय व्यक्तिमत्व नसून जगातील नामांकित असे समाजसुधारक सुद्धा आहेत. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारत कशा स्वरूपाचे असावे या संदर्भात त्यांचे विचार पुढील विधानावरून लक्षात येते.

" मै ऐसे भारत के लिए कोशिश करुंगा जिसमे उच निच का कोई भेद न हो जातीयां मिलकर रहती है | ऐसे भारत में अस्पृश्यता व शराब तथा नशीली अनिष्ट के लिए कोई स्थान न होगा | उसमे स्त्री-पुरुष समान अधिकार मिलेंगे | सारी दुनिया से हमारा संबंध शांती और भाईचारा का होगा | यह मेरे सपनो का भारत |``

वरील विधानावरून समतेवर आधारित भारत अशी त्यांची विचारसरणी होती हे स्पष्ट होते. भारतातील सर्व नागरिक सारखे रहावेत, माणसामाणसांमध्ये भेद असू नये, सारी माणसे एकाच ईश्वराची लेकरं आहेत. असे त्यांचे मत होते. परमेश्वर सर्वव्यापी आहे. प्रत्येकाच्या मनात देव दडलेला आहे. देव जागा होणे म्हणजेच हृदय परिवर्तन आत्मपीडनाने देवाला साकडे घालण्याची हिंदू संस्कृतीत परंपरा चालत आलेली आहे. त्या परंपरेप्रमाणे स्वतः पीडा सोसून प्रतिपक्षाचे हृदय परिवर्तन करावे असा त्यांचा प्रयत्न होता. त्याकाळात अस्पृश्यता हा भारतीय समाजाला लागलेला फार मोठा कलंक होता आणि तो दूर करण्यासाठी गांधीजींनी अखिल भारतीय स्तरावर प्रयत्न केले. परंपरेचे उपयोजन राजकारणासाठी समाजसुधारणेसाठी करणे सामूहिक संघर्ष करणे ही त्यांच्या प्रतिज्ञा ची किमया आहे.

गांधीजी अत्यंत धार्मिक होते, गांधीजींच्या आई-वडिलांच्या धार्मिक वृत्तीचा ठसा गांधीजी वर पडला होता. त्यांची आई पुतळाबाई वृत्तीने फार धार्मिक होती. ते रोज देव दर्शनाला जात, देव दर्शन घेत उपास-तपास व वृत्त वैकल्य यात पुतळाबाई बुडालेल्या असत. वृत्त वैकल्य व उपवास तापास यांची विशुद्ध आचरणाची जी अतूट सांगड गांधीजीच्या जीवनात पडलेली होती ती आईमुळेच असावी. परमेश्वराच्या अस्तित्वावर त्यांची पूर्ण श्रद्धा होती. परमेश्वराच्या हाती स्वतःला सोपवून निष्काम बुद्धीने कर्तव्य करत रहावे हि गीतेची शिकवण त्यांनी स्वतःच्या अंगी बाणवली होती.

**गांधीजींचे अस्पृश्यतेचे बाबत विचार :**

गांधीजीच्या दृष्टीने अस्पृश्यता हे हिंदू धर्माचे अंग नव्हते पण हिंदू धर्मात नंतर वाढलेली एक विकृती होती. अस्पृश्यता दूर करणे म्हणजे धार्मिक सुधारणा होय असे गांधी मानत. असत ते स्वतःला अभिमानाने हिंदू म्हणत आणि हिंदू धर्म आपणाला उदारता नि परमत सहिष्णुता शिकवतो असे सांगत.

अस्पृश्यतेचा प्रश्न गांधीजी पूर्ण धार्मिक समजत होते. पण धर्म सर्व समाज जीवनाच्या आणि व्यक्ती जीवनाच्या मुळाशी असला पाहिजे असे त्यांचे मत होते. शिवाय अस्पृश्यता ही आपल्या राष्ट्राला लागलेली कीड आहे असे त्यांचे ठाम मत होते.

**अस्पृश्यता पालनाचे विरोधक गांधी**

गांधीजी अस्पृश्यता पालनाचे विरोधक होते चातुर्वण्याचा पुरस्कार त्यांनी केला. पण या वर्णव्यवस्थेत शरीर श्रम करणाऱ्या शूद्राला माणुसकीचे अनेक अधिकार नाकारण्यात आलेले आहेत हे गांधीजींना मान्य नव्हते. गांधीजींनी कधीही यज्ञ केला नाही किंवा करवीला नाही. शिक्षण घेण्याचा अधिकार सर्व स्त्री-पुरुषांना आहे हे ते मानत असत. प्रत्येकाने घाण साफ करण्याचे श्रम व उत्पादक श्रम केले पाहिजेत असा दंड त्यांचा होता. टॉलस्टॉय फार्म, फिनिक्स वसाहत साबरमती अश्रम व सेवाग्राम या सर्व ठिकाणी ते स्वतः संडास साफ करण्याचे काम करीत असत, चप्पल जोडे बनवणे, सूत कताई, इत्यादी कामे स्वतः करत यातून शरीर श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांची सतत धडपड चालू असायची.

गांधीजी मंदिर प्रवेशाचे समर्थक राहिले अस्पृश्यां साठी खुल्या केलेल्या प्रत्येक महत्त्वाच्या मंदिराला श्रद्धापूर्वक भेट दिली जे मंदिर अस्पृश्यांना मुक्त प्रवेश देत नाही अशा मंदिरांमध्ये पाऊल टाकायचे नाही असे बंधन गांधीजींनी स्वतःवर लादून घेतले होते. एका अस्पृश्य कुटुंबाला त्यांनी आपल्या आश्रमात प्रवेश दिला आणि त्यांच्यावर गावाचा जणू बहिष्कारच पडला राजकारणातल्या अस्पृश्य प्रश्नाने त्यांच्यावर पहिला आघात केला.

**वर्ण कल्पना आणि गांधी**

हिंदू धर्मातील वर्ण कल्पना त्यांना मान्य होती पण गुणधर्मावर आधारलेले चार वर्ग म्हणजे वर्ण असे ते म्हणत असत चातुर्वर्ण्याचा पुरस्कार गांधीजी यांनी केला होता. त्यावेळी त्यांनी मांडलेली भूमिका अशी होती की औद्योगिक क्रांतीनंतर पश्चिम युरोपात जी अर्थव्यवस्था उदयाला आली ती जास्तीत जास्त नफा कमविण्यासाठी जीवघेणी स्पर्धा करावयाच्या तत्वावर आधारलेली आहे ती बहुसंख्य कष्टकऱ्यांचे शोषण करणारी आहे व एकंदर समाजाचेही आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक नुकसान करणारी आहे त्या जीवघेण्या स्पर्धेवर आधारलेल्या व्यवस्थेला पर्याय म्हणून आपण चातुर्वर्ण्य पद्धत चालवावी वडिलोपार्जित व्यवसायाचे प्रशिक्षण नव्या पिढीला आपोआप व सहजगत्या मिळते ते कौशल्य संपादन केल्याने प्रत्येकाला आपली उपजीविका चालवणे सोपे जाते या एवढ्याच अर्थाने त्यांनी चातुर्वर्ण्याच्या पुरस्कार केला होता. जाती व पोटजाती हे वर्ण कल्पनेवर वाढलेले बांडगुळ आहे असे त्यांचे मत होते. पोटजातीचा सुळसुळाट त्यांना अगदी नको होता आणि जाती व्यवस्थेतील उच्चनीच भाव त्यांना पूर्णपणे त्याज्य वाटे यासाठीच

अस्पृश्यांनी आपसातील पोट जाती आणि अस्पृश्यता आधी मोडीत काढावी असे गांधीजींना वाटे.

**हरिजन आणि गांधी**

महाराष्ट्रातील दलितांचा हरिजन या शब्दावर फार मोठा आक्षेप आहे. गांधीजी हरिजन या शब्दांनी अस्पृश्यांचा उल्लेख करीत हा आपल्याला अपमानास्पद आहे असे दलितांना वाटे. हरिजन हा शब्द गुजराती वैष्णव संतांच्या साहित्यातून गांधीजींनी घेतला आहे. वैष्णवजन हरिजन हे शब्द आदर वाचक आहेत त्यांचा अर्थ वंदनीय आदरणीय असा होतो.

गांधीजीनी हरिजन साप्ताहिक पुण्यातून प्रकाशित केले त्यात राजकारण अजिबात न आणता ते केवळ अस्पृश्यांच्या प्रश्नांसाठी वाहिले होते. अस्पृश्यतेविरुद्ध त्यांनी उपोषण केले उपोषणाचा सरकारशी काहीही संबंध नाही हे जाहीर केले. गांधीजी धर्मसुधारक होते अस्पृश्यतेची परंपरा त्यांना मोडायची होती अस्पृश्य किंवा हरिजन तर्काने किंवा विचाराने गांधीजीच्या जीवनात प्रविष्ट झाले नाही. ही गांधीजींची नैसर्गिक धर्म बुद्धी होती तिच्यामुळे गांधीजींनी त्यांना हृदयाशी ओढले.

**वर्णभेदविरोधी समतेचा लढा आणि गांधी**

दक्षिण आफ्रिकेत जेव्हा वर्णभेदविरोधी समतेचा लढा त्यांनी उभा केला तेव्हा सर्व विस्कळीत हिंदी समाजाला एकत्रित आणणे आवश्यक होते. धर्म प्रेरणा इतर प्रेरणा होऊन प्रभावी झाली तेव्हा गांधीजी चे गांधीपण प्रकट होऊ लागले गांधीजींना तेथील वास्तव्यात अनेक बरे वाईट अनुभव आले. तेथील गोऱ्या राजवटीत हिंदी लोकांना अतिशय अपमानास्पद वागणूक दिली जात असे. हिंदी लोकांना गुलामासारखे वागवले जात असे. काळे म्हणून त्यांच्यावर डोईजड कर लावण्यात आले होते त्यांच्यासाठी वेगळी हॉटेल्स, वसाहत होती त्यांना मतदानाचा अधिकार नव्हता. दक्षिण आफ्रिकेतील भारतीय लोक हा सर्व अन्याय निमूटपणे सहन करीत गांधीजींना हे सहन झाले नाही. त्यांनी आफ्रिकेतील भारतीयांना जागे केले त्यांच्यातील आत्मविश्वास जागवला आणि गोऱ्या राजवटीविरुद्ध अंशात्मक लढा पुकारला. असा अभिनव प्रतिकार पुढे सरकार नमले तेथील गोऱ्या सरकारने हिंदी लोका वरील बंधने रद्द केली, अन्यायी कायदे मागे घेतले, गांधीजीच्या सत्याग्रह या अस्त्राचा प्रयोग यशस्वी झाला.

**अस्पृश्यांसाठी विभक्त मतदारसंघ आणि गांधी**

1932 रोजी ब्रिटिश पंतप्रधान रम्से मॅक्डोनाल्ड यांनी प्रांता-प्रांतात जातीय मतदारसंघ असतील हे जाहीर केले यात मुसलमान व दलित यांना वेगळा स्वतंत्र मतदार संघ देण्यात आला. याविरोधात गांधीजींनी उपोषण सुरू केले. याचाच परिणाम म्हणून बऱ्याच वाटाघाटी झाल्या व सप्रु-जयकाराची एक योजना उभयपक्षी मान्य झाली, एका द्विस्तरीय निवड पद्धतीवर एकमत झाले. यामुळे सर्व देशाचे अस्पृश्यतेच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित झाले. तसेच बिर्ला सेठ यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईला एक अखिल भारतीय अस्पृश्यता विरोधी संघ स्थापन झाला

**सारांश**

गांधीजी हे अस्पृश्यता झुगारून देणारे एक महान नेते होते. त्यांनी समाजातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी फार मोठा लढा दिला. त्यांच्या अस्पृश्यता निवारण कार्यामुळे हिंदूधर्म अधिक

संघटित झाला. अस्पृश्यतेचे उच्चाटन व्हावे यासाठी गांधीजींनी आपले संपूर्ण जीवन खर्ची घातलेव अस्पृश्यता निर्मूलनाचे फार मोठे कार्य पार पाडले.

**संदर्भ**

1.पवार ना.ग.(2005) शिक्षण क्षेत्रातील विचारवंत (भारतीय व पाश्चिमात्य) नित्य नूतन प्रकाशन, पुणे.

2. राष्ट्रपिता महात्मा गांधी विशेषांक, महाराष्ट्र संचार 2007

3.धर्माधिकारी भाऊ (1994) गांधी विचार दर्शन धर्मविचार, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे.

4.गोखले द.न. (1996) गांधीजी मानव कि महामानव, मौजे प्रकाशन, मुंबई

5.जाधव व्ही.के. (2004) आधुनिक भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर.